महाराष्ट्र पोलीस

स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E Mail - pilcbnskr@gmail.com


---

# प्रेसनोट

दिनांक :- ११/०५/२०१८

## मालेगाव शहरात अवैधरित्या धारदार शस्त्रे बाळगणारे इसमास स्थागुशाचे पथकाने केले जेरबंद

---

नाशिक परिक्षेत्राचे **मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. विनयकुमार चौबे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे परिक्षेत्रातील पाचही जिल्हयांमध्ये अवैध शस्त्रे/अग्निशस्त्रे बाळगणारे इसमांवर कारवाई करणेसाठी विशेष मोहिम राबविली जात आहे. सदर मोहिमेदरम्यान नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो.**, व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.**यांनी जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्यांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास अवैधरित्या शस्त्रे/अग्निशस्त्रांचा वापर करणारे इसमांवर सत्वर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे सराईत गुन्हेगारांची माहिती घेणेबाबत तसेच जिल्हयातील औद्योगिकदृष्टया प्रगत असलेल्या शहरांमध्ये परराज्य व बाहेरील जिल्हयातुन शस्त्रांची देवाण-घेवाण करणारे इसमांचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे दिनांक १०/०५/२०१८ रोजी रात्रीचे सुमारास स्थानिक गुन्हे शाखेचे मालेगाव पथकातील अधिकारी व कर्मचारी मालेगाव शहरात अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे इसमांचा शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार काही इसम मालेगाव शहरातील जाफरनगर परिसरात अवैधरित्या धारदार शस्त्रे बाळगुन काहीतरी गुन्हा करण्याचे उद्देशाने फिरत असल्याचे समजले वरुन पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचुन **इसम नामे १) मोहम्मद रिजवान रमजान उर्फ कडया**, वय १९, रा. बिस्मिल्ला हॉटेलजवळ, जाफरनगर, मालेगाव यास जाफरनगर परिसरातुन ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमाची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात **०३ धारदार तलवारी, व ०२ रॅंबो चाकु** मिळुन आले. सदर इसम हा विनापरवाना बेकादेशीररित्या घातक शस्त्रे कब्जात बाळगतांना मिळुन आल्याने त्याचेविरुध्द **पवारवाडी पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे मार्गदर्शनाखाली **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि **संदिप दुनगहू,** सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, राजु मोरे, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ अशांचे पथकाने सदरची कामगिरी केली आहे. अवैधरित्या शस्त्रे बाळगणारे इसमांवर यापुढेही कारवाई सुरू राहणार आहे.